नि.दि.दावा क्र. ८३/२०१५
मुरलीधर पाटील +१ वि. हिम्मत पाटील+२

CNR-MHDH05-001491-2015

## निशाणी क्र. ७६ वर आदेश

अर्ज व त्यावरील प्रतिवादी यांचे खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी आजचे कामकाज तहकूब होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांचे थोडक्यात कथन की, सदर कामी वादीच्या उलट तपासणीवर तारीख आहे. परंतु वादीचे जवळचे नातेवाईक मयत झाले असल्याने वादी हे अंत्यविधीसाठी गेले आहे. त्यामुळे आजचे कामकाज तहकूब होऊन पुढील मुदत मिळावी, अशी त्यांनी विनंती केली.

३. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी यांच्यातर्फे हरकत घेण्यात आली. वादी हे मुद्दाम व हेतुपुरत्सर प्रकरण लांबणीवर टाकत आहे. सबब अर्ज रद्द करावा, अशी त्यांनी विनंती केली.

४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकूण घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. दावा वाटणीसाठी व कब्जासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांचेतर्फे विनाखुलासा आणि प्रतिवादी क्र. ३ यांचेतर्फे एकतर्फा चालविण्याचा आदेश दिनांक १३.०४.२०१६ रोजी पारित करण्यात आला. प्रतिवादी क्र. १ यांच्या अर्जान्वये प्रतिवादी यांचा लेखी जबाब नि.क्र. ५२ अन्वये अभिलेखावर दाखल करण्यात आला. न्यायालयाने नि.क्र. ५३ अन्वये वाद निश्चित केले.

५. त्यापुर्वी वादी यांचे सरतपासणीचे शपथपत्र नि.क्र. १६ व त्याचे साक्षीदार यांचे शपथपत्र ४१ अन्वये दाखल आहे. वादी यांचेतर्फे दिनांक १५.०४.२०१६ रोजी पुरसीस दाखल करण्यात आली. तसेच वादी यांचा लेखी युक्तीवाद देखील अभिलेखावर दाखल आहे.

६. वादी यांचेतर्फे दाव्यामध्ये नि.क्र. ५६ अन्वये दुरूस्ती करण्यात आली आणि प्रतिवादी क्र. ४ यांना सामील करण्यात आले. त्यानंतर वादी यांनी मुदतीचे अर्ज अभिलेखावर वेळोवेळी दिल्याचे दिसून येते. वादी यांनी नि.क्र. ३८ अन्वये शपथपत्र दाखल केले आहे. अधिकचा सरतपास हा दिनांक १४.०९.२०२२ रोजी घेण्यात आला. प्रतिवादी यांचे नि.क्र. ७५ च्या अर्जान्वये प्रकरण हे तहकूब करण्यात आले.

७. मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्याचा परिणाम हा न्यायालयीन कामाकाजवर देखील झाला होत. न्यायालयीन कामकाज हे मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेल्या परिपत्रकान्वये सुरू होते. मा. उच्च न्यायालयाच परिपत्रकान्वये कामकाज हे दिनांक ०२.०८.२०२१ पासून पूर्ववत सुरु झाले आहे.

८. दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश १७ हे तहकुबी बाबतचे आहे. यामध्ये तीन वेळेस तहकुब करावे, या आशयाचा मानद आहे, असे दिसून येते. प्रकरण हे सन २०१५ चे आहे. अर्जातील नमुद कारण हे वादी यांचे जवळचे नातेवाईक मयत झाले आहे, असे आहे. सबब एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

- अर्ज हा मंजुर करण्यात येतो.
- वादी यांना निर्देश देण्यात येते की, त्यांनी या पुढे प्रकरणात कार्यवाही करावी.

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2022.11.19 17:26:09 +0530

साक्री **( रा.भा.डोळे )**

दिनांक : १९.११.२०२२. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

: **<u>प्रमाणपत्र:</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – १९.११.२०२२.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३